-: प्रेसनोट दिनांक- ०४/०२/२०२२ :-

**श्री असिफ नसिरूददीन शिराजभाई, पो.हे.कॉ.ब.नं.८००,शहापूर पोलीस ठाणे व श्री जगदीश भुपाल संकपाळ, वय-३८ , पोलीस पाटील, यड्राव ता. शिरोळ, जि. कोल्हापूर, यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत........**

---

तक्रारदार यांचे पत्नीने तक्रारदार व त्यांची आत्या व बहिण यांचेविरूध्द करमाळा पोलीस ठाणे येथे सन २०१४ साली गुन्हा दाखल केला आहे. तक्रारदार यांची आत्यांचे नावे मा.करमाळा कोर्टाने शहापूर पोलीस ठाणेस वॉरंट पाठविले आहे. त्याबाबत पोलीस शिराजभाई व यड्राव गावचे पोलीस पाटील यांनी तक्रारदार यांना सदरचे वॉरंट तामील करायचे नसलेस ३०००/-रू दयावे लागतील. त्यावेळी तक्रारदार यांनी नाईलाजास्तव त्यांचेजवळ असलेले १०००/- रू दिले. त्यानंतर पोलीस शिराजभाई यांनी उर्वरीत २०००/-रू पोलीस पाटील यड्राव किंवा माझेकडे आणून दया असे सांगितले.

त्याअनुषंगाने तक्रारदार यांनी शहापूर पोलीस ठाणेचे पोलीस शिराजभाई व श्री संकपाळ, पोलीस पाटील यड्राव यांनी २०००/- रू. लाचेची मागणी केलेबाबत तक्रार प्राप्त झाली होती.

तक्रारीप्रमाणे पडताळणी केली असता पोलीस शिराजभाई, शहापूर पोलीस ठाणे व श्री संकपाळ,पोलीस पाटील, यड्राव ता.शिरोळ यांनी २०००/-रू लाचेची मागणी करून तडजोडीअंती १५००/-रू मागणी केल्याने त्यांचेविरूध्द सापळा कारवाई आयोजित केली असता, दिनांक ०४/०२/२०२२ रोजी पोलीस पाटील श्री संकपाळ यांनी शहापूर पोलीस ठाणेचे पोलीस शिराजभाई यांचेकरीता आपले रहाते घराचे समोर शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडून १५००/- रू. लाच रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहात पकडणेत आले आहे. सदरबाबत आरोपी लोकसेवक श्री असिफ नसिरूददीन शिराजभाई ,पो.हे.कॉ.ब.नं.८००,शहापूर पोलीस ठाणे व श्री जगदीश भुपाल संकपाळ, वय-३८ , पोलीस पाटील, यड्राव ता. शिरोळ, जि. कोल्हापूर यांचेविरूध्द शहापूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे, श्री. सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्री. सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे श्री आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक यांचे मार्गदर्शनानुसार श्री.नितीन कुंभार, पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, पो.हे.कॉ.शरद पोरे, पो.ना. विकास माने, पो.ना. कृष्णात पाटील, रूपेश माने व अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.

१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१
२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.
३)श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३, कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.
४)हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.
५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.

Scanned by TapScanner